# मराठी ई-बुकांची विक्री वर्षाला ५० हजार

## ई-लायब्ररी, ऑनलाइन पुस्तक खरेदी जोरात!

**शिल्पा सुर्वे** |
दि. १४ (मुंबई)

**बुकगंगा** डॉट कॉम या संकेतस्थळावर सध्या महिन्याला ३५०च्या आसपास मराठी ई-बुक्स येत आहेत. सध्या वर्षाला ५० हजार ई-बुक्स आणि छापील पुस्तके विकली जातात. ई-बुक म्हणजे पुस्तक इंटरनेटवरून डाऊनलोड करून संगणकावर किंवा टॅब्लेटवर वाचणे. ही खरेदी क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेट बँकिंगद्वारे करता येते.

ऑनलाइनमधील विश्वासार्हता वाढल्याने मराठी माणूस ई-खरेदीला पसंती देत आहे. आगामी काळात महिन्याला १ ते २ हजार नवीन ई-बुक्स उपलब्ध करून दिली जातील, अशी माहिती बुक




गंगाचे हर्षद मरकड यांनी दिली. त्यांच्या ई-लायब्ररी या संकल्पनेअंतर्गत महिन्याला ठराविक सभासद वर्गणी भरून पाच मराठी पुस्तके ऑनलाइन वाचता येतात. मराठी प्रकाशकांचा ई-बुकसाठीचा ओढा वाढत चालला आहे. छपाईचा खर्च येत नसल्याने छापील पुस्तकांच्या किमतीपेक्षा ई-बुक २० ते २५ टक्के स्वस्त पडते.